दैनिक
# जिल्हा टाईम्स
संपादक : प्रमोद विठ्ठल दळवी
Digital Copy
RNI NO : MAHMAR/2015/64432
नंबर १
ऑनलाईन मराठी दैनिक
आपली बातमी, आपला पेपर
जिल्हा टाईम्स
jilhatimesnews@gmail.com 9819249692
dalvipress@gmail.com 0251-2523502
वर्ष : ७ ◆ अंक : १३ बुधवार, दि. २८ एप्रिल २०२१ पाने ४ ◆ मूल्य : रु. २

# एक हात मदतीचा; मास्क व पाणी वाटप





-महेश्वर तेटांबे-

जिल्हा टाईम्स मुंबई, दि.२७- युनिव्हर्सल हुमन राइट कौन्सिल भारत मुंबई टीम व अक्षरा सामाजिक प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई पोलीस कमिशनर हेमंत नगराळे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत मुंबई मधील उन्हातान्हात उभे राहून नाकाबंदी साठी व लोकांना सुरक्षित ठेवण्यासाठी आपले कर्तव्य बजावत असलेल्या पोलीस बांधवांसाठी त्यांच्या कर्तव्यावर असलेल्या ठिकाणी जाऊन त्यांना मोफत पाणी व मास्क वाटप करण्यात आले. सादर कार्यक्रमास सुरुवात सकाळी ११.३० पासून दादर टी. टी सर्कल येथून करण्यात आली.

चित्रा टॉकीज येथे नाकाबंदी वर असलेल्या पोलीस अधिकारी व शिपाई यांना पाणी वाटप करण्यात आले. लालबाग गणेश गल्ली येथे पाणी वाटप करण्यात आले, तेजुकाया मेंशन, हिरामणी मार्केट पोलीस बीट, काळाचौकी पोलीस ठाणे, नागपाडा वाहतूक पोलीस चौकी, भायखळा या सर्व ठिकाणा वरील जवळ जवळ १५० ते २०० पोलीस अधिकारी व शिपाई यांना मोफत पाणी, मास्क वाटप करण्यात आले.

▸▸ पान २ वर

# एक हात मदतीचा; मास्क व...

(पान १ वरुन) पोलीस दलाकडून वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोकुळ सिंग पाटील (काळाचौकी पोलीस ठाणे) यांनी युनिव्हर्सल ह्यूमन राईट कौन्सिल व अक्षरा सामाजिक संस्थेचे आभार मानले. सदर कार्यक्रमास महाराष्ट्र कार्याध्यक्ष जितेंद्र दगडू दादा सकपाळ, मुंबई महासचिव व अक्षरा संस्थेचे अध्यक्ष अमोल वंजारे, चिंचपोकळी ब्लॉक प्रेसिडेंट सौ. वसुधा वाळूंज, दादर ब्लॉक प्रेसिडेंट सचिन जाईजोडे, संजीव परमार, अंजली भोसले व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.